Tipni.lwp

# सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे कार्यालय

**नवीन मध्यवर्ती इमारत, २ रा मजला, पुणे -१**

फोन नं. २०-२६१२२८४६/४७ E-mail- commcoop२०११@gmail.com

जा. क्र. गृह/डी-३/गृहनिर्माण संस्था नोंदणी/१४-सआ

दिनांक:- १९ जुलै, २०१९

**प्रति**

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
२. सहनिबंधक, सहकारी संस्था (सिडको), नवी मुंबई.
३. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
४. उपनिबंधक, सहकारी संस्था (म्हाडा), मुंबई.
५. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (झो.पु. प्रा.), मुंबई.

**विषय** :- प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करणेसाठी संस्थेच्या नावावर जागा असणेची अट शिथील करणेबाबत.

**संदर्भ** :- (१) या कार्यालयाचे क्र.गृह/डी-३/संस्था नोंदणी/२०१०, दिनांक २९.११.२०१० चे परिपत्रक.
(२) शासन पत्र क्र. सगृयो-२०१९/प्र.क्र. २२/१४-स, दिनांक २५.६.२०१९ चे पत्र.

सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणी संदर्भात या कार्यालयाचे दिनांक २९.११.२०१० च्या परिपत्रकान्वये आवश्यक ती कागदपत्रे निश्चित केली आहेत. त्यातील अट क्र. १३ नुसार "जागा शासनाने किंवा निमसरकारने संस्थेस देऊ केल्यास त्यांचे जागा देण्याबद्दलचे हमीपत्र" घेण्याची अट आहे.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना घरकुले बांधण्यासाठी अनुदान उपलब्ध होते. घरकुल पात्र लाभार्थी केवळ जागे अभावी घरकुलाच्या लाभापासून वंचित राहतो. ही बाब विचारात घेऊन ग्राम विकास विभागाने क्र. पीडीयु-२०१८/प्र.क्र. २५७/योजना-१०, दिनांक २.८.२०१८ चे शासन निर्णयान्वये "पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना" अंमलात आणली आहे. या कार्यालयाच्या दिनांक २९.११.२०१० च्या परिपत्रकानुसार संस्थेच्या नावावर नोंदणीपुर्वी जागा असणे आवश्यक आहे. या अटीमुळे पात्र लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) चा लाभ घेता येत नाही. म्हणून शासनाने दिनांक २५.६.२०१९ चे पत्रान्वये, "पंतप्रधान आवास योजने अंतर्गत नोंदणी करावयाच्या गृहनिर्माण संस्थाबाबत गटविकास अधिकारी यांनी प्रमाणित केलेले पात्र सभासद / व्यक्तींची यादी सादर केल्यास अशा संस्थांची नोंदणी प्रत्यक्ष जागा खरेदी केलेली नसतांनाही मुख्य प्रवर्तक यांचे हमीपत्र घेऊन करण्यात यावी", असे आदेश दिलेले आहेत.

त्यामुळे या कार्यालयाचे दिनांक २९.११.२०१० च्या परिपत्रकातील अट क्र. १३ ची मूळ अट कायम ठेवून त्यामध्ये पुढील मचकुर समाविष्ठ करणेत येत आहे.

**पंतप्रधान आवास योजने अंतर्गत नोंदणी करावयाच्या गृहनिर्माण संस्थाबाबत गटविकास अधिकारी यांनी प्रमाणित केलेले पात्र सभासद / व्यक्तींची यादी सादर केल्यास अशा संस्थांची नोंदणी प्रत्यक्ष जागा खरेदी केलेली नसतांनाही मुख्य प्रवर्तक यांचे हमीपत्र घेऊन करण्यात यावी**, सदरची बाब आपले अधिनस्त नोंदणी अधिकाऱ्यांचे निदर्शनास आणून देऊन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(सतिश सोनी)
सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत** — मा. प्रधान सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांना सादर.